सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :**

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/८८ दिनांक : ७ जुलै, २०२२

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...**

**संदर्भ** : १) शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पशियो-२०२२ /प्र.क्र.१०८/तांशि-४, दि.३ जून, २०२२

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/७५,७६ व ७७, दिनांक ८ जून, २०२२

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून, संदर्भाधिन क्र. १ च्या दिनांक ३ जून, २०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये सदरची योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिताची जाहिरात दिनांक ९ जून, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याबाबत आपणांस संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ८ जून, २०२२ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे की, सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज करावयाचे असून, उमेदवारांनी अर्ज करण्याची मुदत दिनांक ८ जुलै, २०२२, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक ११ जुलै, २०२२, सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत आहे. तरी, सदरची मुदत वाढवून आता, उमेदवारांनी online पद्धतीने अर्ज करण्याची मुदत **दिनांक ८ जुलै, २०२२ वरुन दिनांक २२ जुलै, २०२२** अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक **११ जुलै, २०२२ वरुन दिनांक २५ जुलै, २०२२** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यांत आलेली आहे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/औरंगाबाद/अमरावती